# नियमीत दिवाणी दावा क्र. ४५/२०१८ मध्ये निशाणी २३ वरील आदेश

०१. सदरचा अर्ज हा वादीने दाव्यामध्ये दुरुस्ती करण्याची परवानगी मिळावी याकरीता दाखल केला आहे. वादीने मुळ दावा हा अतिक्रमीत क्षेत्राचा ताबा मिळणेकरीता दाखल केला आहे. वादीच्या म्हणण्याप्रमाणे न्यायालयीन आयुक्त यांनी दाखल केलेला अहवाल व मोजणी नकाशानुसार प्रतिवादींनी वादीच्या क्षेत्रावर अतिक्रमण केल्याचे दशविले आहे. सदर अतिक्रमीत क्षेत्राच्या ताब्याबाबत व त्याअनुषंगाने आवश्यक असलेली दाव्यात दुरुस्ती मागितलेली आहे. सबब अर्जात नमूद मजकुर दाव्यामध्ये नमूद करुन तशी दुरुस्ती करण्याची परवानगी मिळावी याकरीता सदरचा अर्ज मंजूर करावा अशी विनंती वादीने केली आहे. सदरचा दावा हा प्रतिवादीविरुध्द एकतर्फा चालविण्यात आल्यामुळे त्यांनी त्यांचे म्हणणे दाखल केले नाही.

०२. अर्ज व दाव्यामधील दस्तावेजांचे अवलोकन केले. वादीच्या विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

०३. वादीने सदरचा अतिक्रमीत क्षेत्राचा ताबा मिळणेकरीता प्रतिवादींविरुध्द दाखल केला आहे. वादीने मुळ दाव्यात परिच्छेद क्र.३ मध्ये प्रतिवादीने १० आर क्षेत्रावर अतिक्रमण दर्शविले आहे. त्याऐवजी ५ आर अतिक्रमण नमूद करण्याचे परवानगी मागितली आहे. तसेच परिच्छेद क्र. ५,६ व ७ मध्ये दुरुस्तीची परवानगी मागितली आहे. वादीचा दावा दुरुस्ती अर्ज पाहिला असता वादीने न्यायालयाकडे जी दुरुस्ती करण्याची विनंती केली आहे, ती सदर दाव्याशी निगडीत आहे. सदर दुरुस्ती ही न्यायालयीन आयुक्ताच्या नकाशावर आधारीत आहे. तसेच, सदरच्या दुरुस्तीमुळे दाव्याच्या स्वरुपामध्ये कोणताही बदल होणार नाही. याउलट, जर वादीची विनंती नामंजूर केली, तर वादीला दाव्याव्यतिरीक्त इतर कोणताही अधिकार राहणार नाही व त्यासाठी वादीला नवीन दावा किंवा अर्ज दाखल करावा लागू शकतो. त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर करण्यास पात्र ठरतो. सबब मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

०१. निशाणी २३ वरील वादीचा दुरुस्ती अर्ज मंजूर करण्यात येतो.

०२. वादीने मागणीप्रमाणे पुढील तारखेला किंवा तारखेपर्यंत दाव्यात दुरुस्ती करावी व दुरुस्तीची प्रत दाव्यात दाखल करावी.

०३. खर्चाबाबत आदेश नाही.

Digitally signed by DNYANESHWAR MADHUKAR GITTE
Date: 2025.07.28 17:30:54 +0530

(डि.एम.गित्ते)

सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, रेणापूर.

दिनांक २४.०७.२०२५.